MAHARASHTRA TOURISM


महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन




# बोहाडा मुखवटे

## साक्ष व्हा, महाराष्ट्राच्या प्रवाही सांस्कृतिक परंपरेचे

# महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे




# अनुभवा
# महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती

महाराष्ट्र ही संस्कृतीची एक समृद्ध वीण आहे, जिथे प्राचीन लेणी आणि आदिवासी वारसा आजही तितक्याच चैतन्याने नांदतो. पालघर आणि नाशिक जिल्ह्यांतील सह्याद्रीच्या कुशीत कोकणा, महादेव कोळी आणि वारली समुदायांच्या गौरवशाली परंपरा जपल्या गेल्या आहेत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) या भागांत 'अमूर्त सांस्कृतिक वारसा' (ICH) आधारित पर्यटन विकसित करण्यासाठी कार्यरत आहे. स्थानिक समुदायांच्या सहकार्याने, महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ आपणास या प्रदेशांतील जिवंत सांस्कृतिक वारसा जवळून अनुभवण्यासाठी आमंत्रित करत आहे. वारली चित्रकलेतील कथा असोत, बोहाडा मुखवट्यांचे सौंदर्य असो किंवा बांबूचे कलाकाम आणि लोकसंगीत; प्रत्येक परंपरा या मातीशी असलेल्या अतूट नात्याची साक्ष देते. हे माहितीपत्रक (brochure) तुम्हाला 'बोहाडा' मुखवटे बनवणाऱ्या कलाकारांच्या पवित्र गावांच्या उंबरठ्यापर्यंत घेऊन जाईल.

येथे संस्कृती केवळ पाहण्यासाठी नाही, तर ती जगण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी आहे.






# पवित्र सोहांग:<br>केवळ एक मुखवटा नव्हे

कोकणा आणि वारली समुदायांसाठी ‘बोहाडा’ मुखवटा हे केवळ एक साधन नसून ते परिवर्तनाचे एक पवित्र माध्यम आहे. जेव्हा एखादा कलाकार हा मुखवटा परिधान करतो (ज्याला ‘सोंग’ म्हटले जाते), तेव्हा तो एका अशा आध्यात्मिक उंबरठ्यावर उभा असतो जिथे त्याचे मानवी अस्तित्व पुसले जाते आणि साक्षात देवतेचे आगमन होऊन ती ग्रामस्थांमध्ये वावरत आहे, अशी श्रद्धा बाळगली जाते. शतकानुशतके जपलेल्या या विधीनाट्याचा केंद्रबिंदू म्हणजे ‘सोहंग’ मुखवटे—52 विविध पात्रांचा असा हा संच, जो एक समृद्ध पौराणिक विश्व साकारतो.

पारंपारिकरीत्या हे मुखवटे जड लाकूड किंवा कमावलेल्या चामड्यापासून बनवले जात असत. काळाच्या ओघात, ही कला विकसित झाली आणि कागदाच्या लगद्याचा वापर करून अधिक सुटसुटीत पण तितकीच कलाकुसर असलेली पद्धत रुढ झाली. मुखवटा बनवणारे कलाकार चिकणमाती आणि रद्दी कागदाचा लगदा वापरुन, नैसर्गिक डिंकाच्या साहाय्याने अर्ध-गोलाकार साच्यांवर हे मुखवटे घडवतात. तयार झालेले मुखवटे वजनाला हलके, टिकाऊ आणि उठावदार रंगांचे असतात.

अनेक पिढ्यांपासून जतन केलेले हे मुखवटे कुटुंबाचा अनमोल वारसा बनतात, जे आजच्या पिढीला त्यांच्या पूर्वजांच्या गौरवशाली इतिहासाशी जोडून ठेवतात.






# परंपरेचे केंद्रस्थान

बोहाडा परंपरा या गावांमध्ये आजही तितक्याच प्रबळपणे जपली जाते:

**पिंपळसोंड:** नाशिक जिल्ह्यातील हे गाव बोहाडा मुखवटे तयार करण्याचे आणि विधीनाट्य सादरीकरणाचे एक महत्त्वाचे केंद्र आहे.

**रामखिंड (जव्हार तालुका) आणि मोखाडा (मोखाडा तालुका):** पालघर जिल्ह्यातील ही गावे बोहाडा परंपरेची 'जन्मभूमी' मानली जातात. या प्रदेशाच्या सांस्कृतिक इतिहासात या गावांची मुळे खोलवर रुजलेली आहेत.

ही गावे केवळ संस्कृतीसाठीच नव्हे, तर निसर्गरम्य दृश्ये, जंगल सफारी आणि स्थानिक समुदायांशी संवाद साधण्याच्या संधींसाठीही ओळखली जातात.





# पूर्वजांच्या वारशाचे रक्षक

कोकणा आणि वारली कलाकार या परंपरेचे खऱ्या अर्थाने संरक्षक आहेत. त्यांनी पिढ्यानपिढ्या हे मुखवटे कापडात गुंडाळून जपले आहेत. घुबा देवीसारखे काही मुखवटे तर 200 वर्षांहून अधिक जुने असल्याचे मानले जाते.

# पौराणिक विश्व :
## देवातुल्य चेहरे, रक्षक आणि लोककथांचा वारसा

येथे येणाऱ्या पर्यटकांना खालील पौराणिक पात्रांचे प्रतिनिधित्व करणारे मुखवटे पाहायला मिळतील:

- जगदंबा माता: मुख्य देवता आणि असुरी शक्तींवरील विजयाचे प्रतीक.
- गणपती: विघ्नहर्ता आणि नवीन कार्याची सुरुवात करणारा.
- वाघोबा: जंगल आणि गावाचा रक्षक.
- हनुमान: वनांचा रक्षक आणि पूर्वजांचा नायक.
- हिडिंबा आणि महिषासूर: आव्हाने आणि गोंधळाचे (अराजकाचे) प्रतीक असणारी सामर्थ्यशाली पात्रे.

प्रत्येक मुखवट्याची स्वत : ची एक स्वतंत्र कथा, स्वभाव आणि महत्त्व आहे, जे स्थानिक कलाकार आणि वडीलधारी मंडळी तुम्हाला आनंदाने समजावून सांगतील.






# बोहाडा उत्सव आणि मिरवणूक

'बोहाडा' या शब्दाचा अर्थ आहे 'मिरवणूक'. हे सृजनशीलतेचे आणि जीवन टिकवून ठेवण्यातील मानवी भूमिकेचे प्रतीक आहे. उत्सवाच्या सात दिवस आधी, कुटुंबे छोट्या टोपल्यांमध्ये भाताची पेरणी करतात आणि नंतर ही रोपे 'गावदेवी'ला अर्पण केली जातात. पाऊस आणि चांगल्या पिकासाठी केलेली ही एक प्रार्थना असते.

प्रत्येक मुखवट्याचे आगमन संबळ, काहाली आणि तुतारीच्या तालबद्ध निनादात होते; ही सर्व वाद्ये नैसर्गिक साहित्यापासून हाताने बनवलेली असतात. कोकणा आणि वारली कुटुंबांनी पिढ्यानपिढ्या जपलेले हे मुखवटे त्यांच्या पूर्वजांशी असलेल्या अतूट नात्याचे प्रतीक आहेत. या उत्सवाचा समारोप जगदंबा मातेने रावणावर मिळवलेल्या विजयाच्या भव्य मिरवणुकीने होतो—जो एकोपा आणि असत्यावर सत्याच्या विजयाचा संदेश देतो.

# निर्मिती प्रक्रिया

बोहाडा मुखवटा तयार करणे ही थरावर थर चढवून आणि साच्यात घडवून केली जाणारी एक अत्यंत सूक्ष्म व कौशल्याची प्रक्रिया आहे:




**घडवण:** माती आणि चिखलाचा वापर करून गोलाकार साचा बनवला जातो.




**थर लावणे:** या साच्यावर कागदाच्या पट्ट्या आणि लगदा नैसर्गिक डिंकाच्या सहाय्याने चिकटवला जातो.




**आकार देणे:** : लगदा ओला असतानाच देव आणि दानवांचे चेहेरे हाताने कोरले जातात.




**वाळवणे आणि घासणे:** वाळल्यानंतर मुखवटा लाकडासारखा टणक होतो, मग तो गुळगुळीत केला जातो.




**रंगकाम:** : गडद आणि उठावदार रंगांचा वापर करून कलाकार त्या पात्रात जणू प्राण फुंकतात.



# कलाकुसरीचा विकास

हे मुखवटे आजही गावातील विधींचा मुख्य गाभा असले, तरी कलाकारांनी आपल्या कौशल्याचा विस्तार करत आधुनिक जगासाठी काही उत्कृष्ट कलाकृती साकारल्या आहेत:

**भिंतीवरील कला:** अंतर्गत सजावटीसाठी 52 सोंहग मुखवट्यांच्या लहान प्रतिकृती.

**कलाकृती:** आदिवासी नर्तक आणि देवतांच्या कागदाच्या लगद्यापासून बनवलेल्या देखण्या मूर्ती.

**आधुनिक व्यक्तिमत्त्वे:** ऐतिहासिक आणि समकालीन प्रसिद्ध व्यक्तींचे मुखवटे, जे या कलेतील नवनवीन प्रयोग आणि कल्पकता दर्शवतात.






# पालघरचे ‘लोक इतिहास संग्रहालय’

या सांस्कृतिक भूमीचा प्रवास सुरु करताना डहाणू तालुक्यातील घोलवड गावातील MTDC पालघर लोक इतिहास संग्रहालयाला अवश्य भेट द्या. 1880 च्या दशकातील एका नूतनीकरण केलेल्या शाळेच्या इमारतीत हे जिवंत संग्रहालय वसलेले आहे. हे संग्रहालय या प्रदेशातील समृद्ध वारशाची अतिशय प्रभावी ओळख करून देते.

येथील संग्रहात या परिसरातील सर्जनशील परंपरांचे दर्शन घडते; ज्यात बोहाडा मुखवटे, वारली चित्रकला, बांबू हस्तकला, तारपा संगीत आणि इतर लोककलांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, येथील दैनंदिन वापरातील वस्तू स्थानिक रहिवाशांनी अत्यंत उदारपणे या संग्रहालयासाठी दिल्या आहेत.







# परंपरेचा अखंड उत्सव

नाशिकच्या "अमूर्त सांस्कृतिक वारसा महोत्सवाचे "(Intangible Cultural Heritage) पहिले पर्व सुरगाण्यातील कला आणि हस्तकलेची गावे असलेल्या श्रीभुवन, चिंचपाडा आणि पिंपळसोंडसह आजूबाजूच्या पाड्यांमध्ये उत्साहात साजरे झाले. या महोत्सवाच्या माध्यमातून स्थानिक परंपरा, कलाकार आणि मातीतील संस्कृतीचा गौरव करण्यात आला. याच चैतन्यमय पायावर आधारित, या महोत्सवाचे दुसरे पर्व 2 ते 4 ऑक्टोबर 2026 दरम्यान आयोजित करीत आहोत.

# प्रवास आणि संपर्क

हा परिसर मुंबईपासून रस्ते आणि रेल्वे मार्गांने सहज उपलब्ध आहे. नाशिक रोड आणि वलसाड ही येथील जवळची रेल्वे स्थानके आहेत. सुरगाणा तालुका नाशिक रोडपासून 95 किमी आणि वलसाडपासून 90 किमी अंतरावर आहे. सुरगाण्याच्या पश्चिम घाटातील निसर्गरम्य रस्त्याने प्रवास करून तुम्ही पिंपळसोंड (बोहाडा मुखवट्यांचे गाव) येथे पोहोचू शकता.


## जवळची प्रेक्षणीय स्थळे

बोहाडा गावांना भेट देताना पर्यटकांना खालील ठिकाणांचाही आनंद घेता येईल:

- हातगड किल्ला: छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायदळातील सैनिकांनी स्वहस्ते बांधलेला ऐतिहासिक किल्ला.
- साखळचोंड धबधबा: पिंपळसोंडपासून अवघ्या 1 किमी अंतरावर असलेला निसर्गरम्य धबधबा.
- तातापाणी: रामायणातील कथांशी संबंधित गरम पाण्याचे झरे आणि प्राचीन मंदिरे.
- आदिवासी संगीत आणि नृत्य: श्रीभुवन, चिंचपाडा, डोलारे, वांगण आणि गलिबारी यांसारख्या जवळच्या गावांमधील पारंपारिक कलाविष्कार.

## कलाकारांशी संपर्क

शिवराम चौधरी - 7588486110
रतन चौधरी - 9423070792
दीपक चौधरी - 7262870513









# बोहाडा मुखवटा: एक अनुभव

थेट मुखवटा बनवणाऱ्या गावांना भेट द्या आणि तेथील कसबी कारागिरांशी संवाद साधा. या भेटीत तुम्ही स्वतः मुखवटे बनवण्याचे प्रशिक्षण घेऊ शकता, कलाकारांसोबत राहून ही कला जवळून अनुभवू शकता आणि नवीन उत्पादन विकासासाठी त्यांच्याशी सहयोग करू शकता.
साहित्याचे सखोल ज्ञान, पर्यावरणीय जबाबदारी आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या हस्तकला परंपरांच्या आधारे शाश्वत डिझाइन आणि नवनवीन प्रयोगांच्या वाटा येथे शोधता येतील.

बोहाडाचा अनुभव घ्या डिझाइनर, वास्तुविशारद आणि खरेदीदारांसाठी:

- सह-निर्मिती: बोहाडा कलेवर आधारित उत्पादने आणि 'स्पेशल इन्स्टॉलेशन्स' विकसित करा.
- खरेदी: हाताने बनवलेल्या अस्सल भेटवस्तू आणि सजावटीच्या वस्तूंची खरेदी.
- सहभाग: कारागिरांनी आयोजित केलेल्या खास 'बोहाडा कार्यशाळांमध्ये' सहभागी व्हा.

अधिक माहितीसाठी स्कॅन करा

MAHARASHTRA TOURISM

Explore Maharashtra - MTDC

www.heritagevillagesmtdc.com

exploremaharashtra.mtdc

ich@maharashtratourism.gov.in